अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | शुक्रवार
२४.०७.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १७४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## शेतरस्ता अडवणाऱ्यांवर आता फौजदारी कारवाई

### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ग्रामीण भागातील शेती, शेतरस्ते, वहिवाट किंवा पाण्याचे प्रवाह बेकायदेशीरपणे अडवणाऱ्यांविरुद्ध राज्य शासनाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. शेतरस्ता अडवणाऱ्यांविरुद्ध आता फौजदारी कारवाई करण्यात येणार असून, या प्रकरणातील अर्धन्यायीक सुनावणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्यासाठी ई-मेलवर पाठवलेली नोटीस ग्राह्य धरली जाणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दिली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल विभागाने मामलतदार न्यायालय कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत. या नव्या नियमांनुसार, तहसीलदारांच्या (मामलतदार) आदेश न मानणाऱ्या आणि शेतरस्ता अडवणाऱ्यांवर कारवाई होईलच, पण बाधित शेतकऱ्याला रस्ता मोकळा करून देण्यासाठी राज्य शासनाकडून 'मोफत' पोलीस संरक्षण देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचे अधिकृत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. नोटीस मिळाली नाही किंवा टाळाटाळ केली, असे कारण देऊन शेतरस्त्याचे विवाद वर्षानुवर्षे ताटकळत ठेवण्याच्या प्रवृत्तीला चाप बसवण्यासाठी 'मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६' मध्ये नवीन 'कलम १४-अ' समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार आता ई-मेलद्वारे पाठवण्यात आलेली नोटीस कायदेशीर मानली जाईल. तसेच, तहसीलदारांचा मनाई हुकूम मोडून रस्ता अडवणाऱ्यांविरुद्ध कारवाई करताना बाधित शेतकऱ्याला 'कलम २१ (५)' अन्वये मोफत पोलीस बंदोबस्त दिला जाईल. तहसीलदारांच्या आदेशात पोलीस सुरक्षेचा उल्लेख राहून गेल्यास गृह विभाग व महसूल विभाग संयुक्तपणे समन्वय साधून शेतकऱ्याला तातडीने संरक्षण पुरवेल, असे बावनकुळे म्हणाले.

**कर्जमाफीची यादी महिनाभरात पूर्ण होणार**

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या कर्जमाफी योजनेबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, राज्य सरकारने शेतकऱ्यांचे ३६ हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. कर्जमाफीच्या याद्यांची पडताळणी प्रक्रियेत असून, येत्या महिनाभराच्या आत या सर्व याद्या पूर्ण केल्या जातील आणि प्रत्येक पात्र शेतकऱ्याच्या खात्यावर अथवा योजनेचा लाभ पोहोचवला जाईल.

## पहिल्यांदा दिल्लीत १८ ऑक्टोबरपर्यंत राष्ट्रीय सुरक्षा कायदा लागू अन आता सर्व पोलिसांच्या सुट्ट्या रद्द

### पोलिस आयुक्तांना कोणालाही ताब्यात घेत ३ महिने नजरकैदेत ठेवण्याचा अधिकार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**दिल्ली** – दिल्लीच्या जंतरमंतवर कॉकरोच जनता पार्टीचं आंदोलन सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील बंदोबस्तात वाढ करण्यात आली होती. राजधानी दिल्लीत विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला हिंसक वळण लागल्यानंतर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्रीय गृह मंत्रालय आणि दिल्लीच्या उपराज्यपालांनी राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार दिल्लीचे नवनियुक्त पोलीस आयुक्त अनुराग कुमार यांना कोणत्याही व्यक्तीला थेट ताब्यात घेण्याचे विशेष अधिकार दिले आहेत. बुधवारी दिल्लीच्या अधिकृत राजपत्रात यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. या अधिसूचनेवर १५ जुलैची तारीख देण्यात आली असून, हे विशेष अधिकार १९ जुलै २०२६ ते १८ ऑक्टोबर २०२६ या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी लागू राहतील.



दिल्लीत पहिल्यांदा राष्ट्रीय सुरक्षा कायदा लागू दिल्ली सरकारने दिल्लीच्या पोलीस आयुक्तांना राष्ट्रीय सुरक्षा कायद्या अंतर्गत विशेषाधिकार वापरण्यास तीन महिन्यांच्या कालावधीसाठी प्राधिकृत केले आहे. हा कालावधी १९ जुलैपासून सुरू झाला आहे. पोलिसांनी यावर स्पष्टीकरण दिले आहे की, हा आदेश नियमित प्रक्रिया असून याचा विद्यार्थी आणि 'कॉकरोच जनता पार्टी' या कार्यकर्त्यांच्या व्यासपीठाद्वारे सुरू असलेल्या निदर्शने/आंदोलनांशी काहीही संबंध नाही. राष्ट्रीय सुरक्षा कायदा अंतर्गत काही विशिष्ट प्रकरणांमध्ये व्यक्तींना प्रतिबंधात्मक नजरकैदेत ठेवण्याची तरतूद आहे. यामध्ये 'राज्य सुरक्षेला बाधा आणणारे कृत्य, सार्वजनिक कायदा व सुव्यवस्था बिघडवणे, किंवा समाजासाठी आवश्यक असलेल्या वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यात अडथळा आणणारे कृत्य' यांचा समावेश होतो. हा कायदा कायद्यात दिलेल्या सुरक्षेच्या नियमांच्या अधीन राहून ठराविक कालावधीसाठी तात्काळ गुन्हेगारी खटल्याशिवाय नजरकैदेत ठेवण्याची परवानगी देतो.

## थोडक्यात

### व्हिडिओचा बेजबाबदारपणे चुकीचा अर्थ लावला, मुंबई पोलिसांनी विनयभंगाचे आरोप फेटाळले

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – कॉकरोच जनता पार्टीच्या समर्थनार्थ मुंबईतल्या दादरमधील आंदोलनादरम्यान एका विद्यार्थिनीचा पोलिसाने विनयभंग केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला. सदर घटनेचा व्हिडिओही राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार, खासदार सुप्रिया सुळे, काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी शेअर करत संताप व्यक्त केला. या व्हिडिओमध्ये मुंबईतील एका विद्यार्थिनीच्या आंदोलनादरम्यानचा हा प्रकार असून एका तरुणीला आक्षेपार्ह पद्धतीने पकडल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. मात्र या सगळ्या प्रकरणावर आता मुंबई पोलिसांनी स्पष्टीकरण दिलं आहे.

## एकीकडे सोनम वांगचुक यांचं उपोषण मागे

### दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टी अजूनही आंदोलनावर ठाम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – राजधानी दिल्लीत सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे गेल्या २५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीपासून उपोषण सुरू होतं.

अखेर २६व्या दिवशी वांगचुक यांनी आपलं उपोषण सोडण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि केंद्रीय राज्यमंत्री जितेंद्र सिंह यांची भेट घेतल्यानंतर वांगचुक यांनी उपोषण सोडण्याचा निर्णय घेतलाय. सोनम वांगचुक यांना सरकारकडून आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी आपले उपोषण संपवले आहे. सोनम वांगचुक यांनी उपोषण संपवल्याबद्दल कॉक्रोच जनता पक्षाचे सर्वेसर्वा अभिजीत दीपके यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. यात एकीकडे सोनम वांगचुक यांचं उपोषण मागे सोडलं असताना दुसरीकडे कॉकरोच जनता पार्टी अजूनही आंदोलनावर ठाम असल्याचे ते म्हणाले आहे.





अभिजीत दीपके यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर आपली प्रतिक्रिया देत म्हणाले की, 'सोनम सरांनी २६ दिवसांनंतर आपले उपोषण संपवल्याने आम्हाला दिलासा मिळाला आहे आणि आम्ही त्यांचे आभारी आहोत. मात्र धर्मेंद्र प्रधान राजीनामा देईपर्यंत जंतर मंतर येथील 'कॉकरोच जनता पार्टी'चे शांततापूर्ण आंदोलन सुरूच राहील.'

सरकारी आश्वासनानंतर घेतलेला निर्णय केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा आणि जितेंद्र सिंह यांची भेट घेतल्यानंतर सोनम वांगचुक यांनी आपले उपोषण संपवले. दोन्ही मंत्र्यांनी गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयाला भेट दिली आणि अनेक मुद्द्यांवर सरकारकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल, असे आश्वासन दिले. दिल्लीतील जंतर मंतर येथे शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या आणि २० जुलै रोजी संसद मोर्चात सहभागी झालेल्यांविरुद्ध दाखल केलेल्या प्रकरणांवर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन सरकारने दिले आहे. केंद्र सरकारने सोनम वांगचुक यांच्या कोणत्या अटी मान्य केल्या? केंद्रीय मंत्री जेपी नड्डा आणि जितेंद्र सिंह, यांनी रुग्णालयात सोनम वांगचुक यांची भेट घेतली.

## नीट पेपरफुटीप्रकरणी फास्ट ट्रॅक न्यायालय

### पंतप्रधान मोदींची घोषणा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – देशातील तरुणांचे कल्याण आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करणे हेच सरकारचे सर्वोच्च प्राधान्य असून, त्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या एकाही दोषीला सोडले जाणार नाही, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी दिला. पेपरफुटी प्रकरणात सहभागी असलेल्यांना तातडीने आणि कठोर शिक्षा मिळावी यासाठी सरकारने 'फास्ट ट्रॅक' (जलद गती) न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे त्यांनी जाहीर केले. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर या संदर्भात त्यांनी पोस्ट केली. तरुणांच्या भविष्याला हानी पोहोचवणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असे मोदी यांनी त्यात म्हटले आहे. कॉकरोचचे प्रत्युत्तर : कॉकरोच जनता पार्टीने मोदींच्या घोषणा म्हणजे मूळ विषयावरून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न असल्याची टीका केली. धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा व अन्य दोन अटींवर तत्काळ मान्य कराव्यात हीच आपली मागणी असल्याचा पुनरुच्चारही पार्टीने केला. काँग्रेसची टीका : काँग्रेसनेही गुरुवारी मोदींवर तीव्र शब्दांत टीका केली.





## गणेशोत्सव महोत्सवासाठी व्यापक कृती आराखडा तयार करा : सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांचे निर्देश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्य सरकारने गणेशोत्सवाला राज्य महोत्सव म्हणून घोषित केल्यानंतर यंदाच्या वर्षी हा उत्सव अधिक व्यापक, सुबद्ध आणि लोकसहभागातून साजरा करण्यासाठी सर्व शासकीय विभागांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा. त्यासाठी विभागनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करून कृती आराखडा तयार करून शासन निर्णय तातडीने तयार करावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी गुरुवारी येथे दिले. गणेशोत्सवाच्या नियोजनासंदर्भात मंत्रालयात झालेल्या बैठकीत शेलार यांनी आज विविध विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत उत्सवाच्या आयोजनाचा सविस्तर आढावा घेतला.



यंदाच्या वर्षी राज्यातील सर्व विभागांनी गणेशोत्सवासाठी किमान उपक्रम निश्चित करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. गणेशोत्सव राज्य महोत्सवाची एकसमान ओळख निर्माण करण्यासाठी अधिकृत लोगो, गीत, माहिती, शिक्षण आणि जनजागृती साहित्य सर्व विभागांना उपलब्ध करून देण्यात यावे.



# जे.पी.नड्डांची मध्यस्थी, शाहांचं प्लॉनिंग अन सोनम वांगचुक यांची संमती

**उपोषण सोडण्यामागची 'इनसाइड स्टोरी' समोर**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी अखेर आपले अमरण उपोषण मागे घेतले आहे.

सोनम वांगचुक यांनी उपोषण सोडण्याच्या या निर्णयामागे केंद्र सरकार आणि त्यांच्यात झालेल्या उच्चस्तरीय चर्चेची अत्यंत महत्त्वाची भूमिका राहिली आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर सरकार आणि सोनम वांगचुक यांच्यात सहमती झाली. केंद्रीय मंत्र्यांनी गुरुग्राम येथील मेदांता रुग्णालयात जाऊन वांगचुक यांना आश्वासनाचे पत्र सोपवले, त्यानंतर त्यांनी आपले उपोषण मागे घेतले ४ तास चालली केंद्रीय मंत्र्यांची बैठक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा आणि पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांच्यात सुमारे चार तास उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीत वांगचुक यांच्या मागण्या आणि त्यांच्या खालावत चाललेल्या आरोग्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत सरकारने सोनम वांगचुक यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्याचा निर्णय घेतला. तसेच त्यांचे आरोग्य आणि सुरक्षा याला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असेही ठरवण्यात आले

# नीट पेपरफुटीची धग देशभरात

**महाराष्ट्र झाला नीट पेपरफुटीचा अड्डा, कुलकर्णीपासून शिवराज मोटेगावकर पर्यंत १३ आरोपी**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – देशभरात खळबळ उडवणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणाची धग संपूर्ण राज्यासह देशभरात दिसून आली. छएएढ पेपरफुटी प्रकरणी सीबीआयकडून राज्यभरात मोठी कारवाई करण्यात आली. नीट पेपर फुटी प्रकरणात एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पेपरफुटी प्रकरणात उइखची मोठी कारवाई देशासह राज्यभरात गाजत असलेल्या छएएढ पेपरफुटी प्रकरणात उइखने आणखी १३ आरोपींना अटक केली आहे. लातूरमधील डॉक्टर मनोज शिरुरे यांनाही या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. रसायनशास्त्र विषयाचे लीक झालेले प्रश्न विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. तर पुण्यातील अझचअ कोचिंग संस्थेतील भौतिकशास्त्र शिक्षक तेजस हर्षदकुमार शाह यांनाही अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर भौतिकशास्त्राचे लीक प्रश्न मिळवल्याचा आरोप करण्यात आला आहे. देशभरातील ४९ ठिकाणी उइखने छापे टाकले असून तपासात अनेक कागदपत्रे, लॅपटॉप आणि मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. यात दिल्ली, जयपूर, गुरुग्राम, नाशिक, पुणे, लातूर आणि अहिल्यानगर येथून आतापर्यंत १३ आरोपी अटकेत आहे. रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि भौतिकशास्त्र विषयांच्या प्रश्नपत्रिका परीक्षेपूर्वीच लीक झाल्याचा तपासात दावा करण्यात आला आहे.

नीट पेपर फुटी प्रकरणातील १३ आरोपी १. पी. व्ही. कुलकर्णी: तपास यंत्रणांनुसार, माजी रसायनशास्त्र तज्ञ पी. व्ही. कुलकर्णी यांनी शिवराज मोटेगावकरच्या सांगण्यावरून नीटचा पेपर फोडला. कुलकर्णी यांनी अनेक वर्षे राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या प्रश्नपत्रिका–निर्धारण समितीवर काम केले होते. त्यांनी या सुरक्षा व्यवस्थेचा आणि गोपनीयतेचा गैरवापर करून प्रश्नपत्रिका फोडली.

२. शिवराज मोटेगावकर: महाराष्ट्रातील लातूर येथील प्रसिद्ध आरसीसी कोचिंग संस्थेचे संचालक हे पेपरनीट पेपर फुटी प्रकरणातील १३ आरोपी १. पी. व्ही. कुलकर्णी: तपास यंत्रणांनुसार, माजी रसायनशास्त्र तज्ञ पी. व्ही. कुलकर्णी हे या संपूर्ण रॅकेटचे सूत्रधार आहेत. कुलकर्णी यांनी अनेक वर्षे राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या प्रश्नपत्रिका–निर्धारण समितीवर काम केले होते. त्यांनी या सुरक्षा व्यवस्थेचा आणि गोपनीयतेचा गैरवापर करून प्रश्नपत्रिका फोडली.

# पंतप्रधानांच्या घोषणेनंतर दिल्ली उच्च न्यायालयाच मोठं पाऊल

**विशेष न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बलिगांची नियुक्ती**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरातील स्पर्धा परीक्षांमधील गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या प्रकरणांमध्ये दोषी आढळलेल्यांना जलद न्याय आणि कठोर शिक्षा देण्याची वचनबद्धता जाहीर केल्यानंतर काही तासांतच, दिल्ली उच्च न्यायालयाने एक मोठे पाऊल उचलले आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी नवीन सार्वजनिक परीक्षा कायदा, २०२४ (गैरप्रकार विरोधी कायदा) अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणांची सुनावणी करण्यासाठी देशातील पहिल्या विशेष फास्ट ट्रॅक न्यायालयाची स्थापना केली. दिल्ली उच्च न्यायालयाने पेपरफुटीशी संबंधित फौजदारी खटल्यांची सुनावणी करण्यासाठी एक जलदगती न्यायालय स्थापन केले आहे. उच्च न्यायालयाने फौजदारी खटल्यांची सुनावणी करण्यासाठी न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बलिगा यांची या जलदगती न्यायालयाच्या विशेष न्यायाधीश म्हणून नियुक्ती केली आहे. हे न्यायालय राऊस ॲव्हेन्यू कोर्ट कॉम्प्लेक्समधून कामकाज करेल अशी देखील माहिती आहे.

दोषींना ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास,१० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद सरन्यायाधीश डी. के. उपाध्याय यांच्या निर्देशानुसार जारी केलेल्या या आदेशानुसार, नवीन गैरप्रकार विरोधी कायद्याअंतर्गत दाखल झालेली सर्व प्रलंबित प्रकरणे तात्काळ या नवीन जलदगती न्यायालयात हस्तांतरित केली जातील. राऊस ॲव्हेन्यू कोर्ट कॉम्प्लेक्समध्ये असलेल्या या विशेष न्यायालयात न्यायमूर्ती अनु ग्रोव्हर बालिगा यांची विशेष सीबीआय न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नीट, यूपीएससी, एसएससी आणि एनटीए यांसारख्या संस्थांद्वारे आयोजित परीक्षांमधील गैरप्रकार रोखण्यासाठी लागू केलेल्या या कायद्यानुसार, दोषींना ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १० लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे.

# विहार तलावात तरुण बुडाला : शोधमोहीम वेगाने सुरू

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – पवई येथील फिल्टरपाडा परिसरातील बंगूर दागावजवळ गुरुवारी दुपारी विहार तलावात १९ वर्षीय तरुण बुडाल्याची दुर्दैवी घटना घडली. कैलास सोमण (१९) असे या तरुणाचे नाव आहे. ही दुर्घटना नेमकी कोणत्या परिस्थितीत घडली, याचा शोध पोलीस घेत आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलाला गुरुवारी दुपारी ३.१८ वाजताच्या सुमारास एक तरुण तलावात बुडाल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार, कैलास तलावाच्या पात्रात उतरला होता आणि अचानक पाण्यात बुडाला.

# मुंबईतील ठाकरे बंधूंचा मोर्चात काँग्रेसही सहभागी होणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**हर्षवर्धन सपकाळ यांची माहिती, तर सुरक्षा कवच म्हणून युवासेनाही मैदानात**



***मुंबई*** – राजधानी दिल्लीच्या जंतर मंतरवर विद्यार्थ्यांचं आंदोलन होत असतानाच आता देशभरामध्ये आंदोलनाचं लोण पसरलं आहे.

दिल्लीसह देशभरात सुरू असलेल्या नीट परिक्षेच्या पेपरफुटीप्रकरणी आणि दिल्लीत सुरू असलेल्या आंदोलनासह केंद्र सरकारच्या भुमिकेवरती आता मुंबईत शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा देण्यासाठी ठाकरे बंधू २६ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढणार आहेत. मुंबईत काल (२३ जुलै) संयुक्त पत्रकार परिषद घेऊन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी मोर्चाची घोषणा करत विद्यार्थ्यांसह विद्यार्थ्यांच्या पालकांनी आणि इतर राजकीय पक्षांनी या मुद्द्यांवर एकत्र येण्याचे आवाहन केलं आहे. दरम्यान, २६ जुलैला (रविवारी) होणाऱ्या मोर्चामध्ये आता काँग्रेस पक्ष देखील सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, रविवारी होणाऱ्या मोर्चाची स्ट्रॅटेजी ठरवण्यासाठी आज महाविकास आघाडीची बैठक होणार आहे. जर विद्यार्थ्यांच्या मुद्द्यावरती सर्व पक्ष एकत्र येत असतील तर आम्हाला कुठलीही हरकत नसल्याची प्रतिक्रिया हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. त्यामुळे रविवारी होणाऱ्या मोर्चामध्ये एकाच मंचावरती राज ठाकरे, उद्धव ठाकरे, यांच्यासह काँग्रेसचे नेते आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेतेही एकत्र दिसणार असल्याचे बोललं जात आहे. सुरक्षा कवच म्हणून युवासेना मैदानात, आदित्य ठाकरे यांचे युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांना आदेश दुसरीकडे, ठाकरे बंधूंच्या मोर्चाच्या अनुषंगाने सुरक्षा कवच म्हणून युवासेना मैदानात उतरेल.

मोर्चला येणाऱ्या मुलांवर पोलीस कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी, असं आदित्य ठाकरे यांनी सुचवलं आहे. २६ जुलैला मुंबईत होणाऱ्या ठाकरेंच्या महामोर्चा आधी युवासेनेची ऑनलाईन बैठक पार पडली.

## वैष्णवांचा मेळा अन् भक्तिरसाचा सोहळा...



**पंढरपूर :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील पारंपरिक गोल रिंगण बाजीराव विहीर (ता.पंढरपूर) येथे गुरुवारी अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडले. विठुरायाच्या ध्यानात दंग होऊन वारकऱ्यांनी केलेले रिंगण म्हणजे भक्ती आणि श्रद्धेचा अलौकिक संगम ! या वेळी वारकऱ्यांनी माउली... माउलीचा जयघोष करत जल्लोष केला.

# कोकण-उत्तर महाराष्ट्रात पावसाचा हाहाकार : पालघरमध्ये पूरस्थिती, नाशिकमध्येही जनजीवन विस्कळीत

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

***मुंबई*** – मुंबईसह संपूर्ण कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात पावसाने गुरुवारी जोरदार हजेरी लावत हाहाकार माजवला. पालघर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे अनेक गावांना पुराचा वेढा बसला असून, रस्ते आणि रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे. ठाणे शहरात २४ तासांत सुमारे १०० मिमी पावसाची नोंद झाली असून, झाडे पडणे, पाणी साचणे अशा घटनांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागला, तर नाशिक जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे धरणांच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ झाली असून, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. बदलापूरमध्ये वादळी वाऱ्यामुळे वीज यंत्रणेला मोठा फटका बसला असून, हजारो ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. वादळी वाऱ्यांचा तडाखा; ३५ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित बदलापूर : मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे बदलापूर शहरातील अनेक भागांमध्ये १५ ते २० झाडे विद्युत वाहिन्यांवर कोसळल्याने बुधवारी रात्रीपासून वीजपुरवठा खंडित झाला.

**दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाच्या विरोधात**

# वंचित बहुजन आघाडीचे तहसिलदारांना निवेदन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***वरुड*** – दिल्लीमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या अन्यायाच्या विरोधात आज वंचित बहुजन आघाडीने समविचारी संघटना व पक्षांना सोबत घेवुन तहसिलदारांना निवेदन दिले.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नीट पेपर फुटी प्रकरणी दिल्ली जंतर मंतर येथे विद्यार्थ्यांनी जे आंदोलन सुरु केले त्या उपोषणाला हिंसक वळण देऊन शासनाने व पोलीस विभागाने बेसुमार लाठीचार्ज करुन विद्यार्थ्यांवर जाणून अन्याय केला.

त्या संदर्भात जेवढेही दोषी पोलीस कर्मचारी आहेत तसेच जे कुणी अधिकारी असतील व प्रधान शिक्षण मंत्री या सगळ्यांवर राष्ट्रपतींनी कारवाई करुन सगळ्यांचे निलंबन करावे, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष सतिश सोनुले यांच्या नेतृत्वात समविचारी संघटना व पक्षांना सोबत घेऊन तहसिदारांना निवेदन देण्यात आले.

वरुड तालुका वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते व काही संघटनांचे कार्यकर्ते यात सहभागी होते. त्यामध्ये सतिश सोनुले, गणेश कुसराम, नामदेव सोनुले, अशोक पवार, प्रविण लांडगे, पुंडलीक देशभ्रतार, अशोक पाटील, दत्तोजी निकोसे, उल्हास लांडगे, प्रा.अशोक ठवरे, रघुनाथ दहीवाडे, सुशिल बेले, श्रावण शियाले, सहदेव गडलिंग, संजय वाघमारे, राहुल लांडगे, जाफरखॉ पठाण, महादेव कडू, अशोक गडलींग यांचे अन्य मान्यवरांचा सहभाग होता.

# संपादकीय

**आयुष्यात कितीही संकटे आली तरी हसतमुखाने त्यांना सामोरे जा, कारण रडण्याने दु:ख कमी होत नाही.**

## राष्ट्रजागृतीचा निर्भीड आवाज

‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!‘ ही सिंहगर्जना करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे केवळ स्वातंत्र्यलढ्याचे महान:यक नव्हते, तर भारतीय पत्रकारितेचे तेजस्वी आणि निर्भीड पुरस्कर्ते होते. आज त्यांच्या १७० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या पत्रकारितेचा वारसा आठवताना भारतीय माध्यमविश्वाला दिशा देणाऱ्या एका युगपुरुषाला अभिवादन करण्याची हीच योग्य वेळ आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात तलवारीपेक्षा लेखणी अधिक प्रभावी ठरली. त्या लेखणीला धार देण्याचे काम लोकमान्य टिळकांनी केले. त्यांनी पत्रकारितेला केवळ वृत्त देण्याचे माध्यम न मानता, समाजजागृती, राष्ट्रप्रेम, अन्यायाविरुद्ध संघर्ष आणि स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे प्रभावी शस्त्र बनवले. आजच्या काळात पत्रकारितेवर अनेक प्रकारचे दबाव, आव्हाने आणि प्रश्नचिन्हे उपस्थित होत असताना टिळकांची पत्रकारिता अधिकच प्रेरणादायी वाटते. सन १८८१ मध्ये लोकमान्य टिळकांनी ’केसरी’ (मराठी) आणि ’द मराठा’ (इंग्रजी) या दोन वृत्तपत्रांची स्थापना केली. त्या काळात भारत ब्रिटिशांच्या गुलामगिरीत होता. अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर बंधने होती, सरकारविरोधी आवाज दडपले जात होते. अशा कठीण परिस्थितीत टिळकांनी आपल्या वृत्तपत्रांतून ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांवर कठोर टीका केली. त्यांनी लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली आणि स्वराज्याची भावना प्रत्येक भारतीयाच्या मनात रुजवली. ’केसरी’ हे वृत्तपत्र सामान्य जनतेचा आवाज बनले. त्यातील अग्रलेख, विश्लेषणे आणि विचारप्रवर्तक लेखांनी महाराष्ट्रासह संपूर्ण देशात राष्ट्रभक्तीची लाट निर्माण केली. टिळकांचे लेखन तर्कशुद्ध, स्पष्ट, निर्भीड आणि प्रभावी होते. कोणत्याही प्रकारच्या सत्तेच्या दबावाला न जुमानता त्यांनी सत्य मांडण्याचे धाडस दाखवले. त्यांच्या लेखांमध्ये सामाजिक प्रश्न, शिक्षण, स्वदेशी, स्वराज्य, अर्थकारण आणि राष्ट्रीय अस्मिता यांचा सखोल ऊहापोह असे. टिळकांची पत्रकारिता ही केवळ विरोधासाठी विरोध करणारी नव्हती. ती विधायक विचारांची होती. समाजातील अंधश्रद्धा, निष्क्रियता आणि भीती दूर करून लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे हा त्यांचा उद्देश होता. पत्रकार हा समाजाचा मार्गदर्शक असावा, असे त्यांचे मत होते. त्यामुळे त्यांच्या लेखनात केवळ टीका नव्हती, तर उपाय, दिशा आणि प्रेरणाही होती. ब्रिटिश सरकारला टिळकांची लेखणी अस्वस्थ करणारी होती. त्यांच्या अग्रलेखांमुळे लोकांमध्ये असंतोष निर्माण होत असल्याचा आरोप करत त्यांच्यावर अनेकदा राजद्रोहाचे खटले भरले गेले. १८९७ आणि १९०८ मध्ये त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. परंतु तुरुंगाची भीती त्यांना कधीच वाटली नाही. उलट प्रत्येक शिक्षेनंतर त्यांची लेखणी अधिकच धारदार झाली. पत्रकारितेतील निर्भीडपणा आणि सत्यनिष्ठा याचे ते सर्वोच्च उदाहरण ठरले.

# ‘पंढरीचा पांडुरंग, हनुमान मैदान आणि शेवटचे खंजरी भजन!’

‘वाचे विठ्ठल गाईन,नाचत पंढरी जाईन‘जीवनभर राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी पंढरीची वारी सोडली नाही, जीवनभर जनता जनार्दनाला खंजरी भजनाच्या माध्यमातून ‘कशाला पंढरी जातो रे बाबा,कशाला काशी जातो, असे आवर्जुन सांगणारे जागतिक किर्तीचे मानवतावादी महान संत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज हे पंढरपूरच्या वारीला जाण्याचे कारण काय? यांच्या कुटूंबातील तिसऱ्या पिढीतील बालवयापासून तुकडोजी महाराज पंढरीनाथाच्या दर्शनासाठी धक्के खात बालवयात पंढरपूरला गेले, तेव्हापासून पंढरी नाथांचे दर्शन घेतले की, आषाढी एकादशीच्या दिवशी हनुमान मैदानावर भव्य दिव्य खंजरी भजनाच्या माध्यमातून जनतेला जागृत करायचे. इ.स.१९६८ची गोष्ट शरीर थकले होते, शरीर साथ देत नव्हतें, भजनाचा झंझावात सुरूच होता. जीवापाड प्रेम केलेल्या खंजिरीतून बोलाजी आतिषबाजी सुरु होती. तिचा मधुर नाद निनादत होता. एक तास वीस मिनिटे खंजरीवर चालणारी बोटे, आजचा तो दिवस आषाढी एकादशीच्या दिवशी खंजरीवरील बोटे शांत झाली, ही अनुभूती हजारों लाखो श्री गुरूदेव सेवकांनी व वारकरी संप्रदायातील ह.भ.प.धुंडा महाराज देगलूरकर, ह.भ.प.गोविंद महाराज कन्हेर, ह.भ.प.प्रा.मामासाहेब दांडेकर, पूज्य रामभाऊ सावंत यांच्या सारख्या किर्तनकार, विचारवंत आणि वारीची परंपरा चालविणाऱ्या वारकऱ्यांनी अक्षरक्षा डोळ्यांनी पाहिले. ही सर्व ज्यांना खरे अध्यात्म कळले होते ती वारकरी मंडळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर नितांत प्रेम करायची, तो दिवस होता दिनांक ६ जुलै १९६८ रोजी आषाढी एकादशीच्या दिवशी ५९व्या वर्षी लाखो भाविकांच्या उपस्थितीत हनुमान मैदानावर आपल्या लाडक्या ‘खंजरी‘सोबत वार्तालाप करीत सवांद साधला आणि मनसोक्त, मनमुराद व मनमोकळेपणाने खंजरीला वाजवून भगवान पंढरीनाथाचे स्वलिखित भजने पंढरीनाथाला आळवली ‘मंगलमय नाम तुझे सतत, गावु दे’ या भजनाने कार्यक्रम शुभारंभ करीत सर्वं वारकरी संप्रदायातील व श्री गुरूदेव प्रेमींनी भजनानंद चाखला, डॉक्टरांनी महाराजांना गाण्याची, बोलण्याची मनाई केली होती, परंतू ‘वारी चुकवू नये, भगवान पंढरीनाथाचे दर्शन घ्यावे आणि निघून जावे, या बेतानेच आलेले महाराज ‘लागला रंग भजनाचा,डोलला देव आमुचा,या भजनाची अनुभूती जनता जनार्दनाला येतंच राहिली, त्यावेळी पूज्य वसंतदास महाराज हे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे स्वीय सहाय्यक होते. तबल्यावर रामदास चिकटे व तर हार्मोनियमवर ह.भ.प.मंछिद्रंनाथ चव्हाण गुरूजी होते. सोबत सद्य:चे अ.भा.श्री गुरूदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस पद्मश्री जनार्दनजी बोथे गुरूजी, बाळासाहेब इंगळे, ह.भ.प. रामपुरी महाराज यांच्या सह निवडक टाळकरी व



यावेळी महाराष्ट्रातील अ.भा. श्री गुरूदेव सेवा मंडळाचे शेकडो सेवक, कार्यकर्ते आषाढीच्या निमित्ताने दर्शनासाठी व खंजरी भजनाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते. आजाराने वाढलेल्या पोटाकडे हात दाखवित त्यांनी अंगुलीनिर्देश केला आणि हा फुटबॉल केंव्हा पंचर होईल? हे सांगता येत नाही, असे सांगून वातावरणातील ताणतणाव दूर करण्याचा प्रयत्न केला, भजन–भाषणाच्या व्दारे वारकऱ्यांशी संवाद साधला, आपले काम इमानेइतबारे करा,कुणाशी बेईमानी करू नका, आपल्या गावातच खरां देव आहे, आपल्या गावाची सेवा करा,‘तुझं गावची नाही का तीर्थ, अरे रिकामा कशाला फिरतं, या भाषेत समजावून सांगितले, देवभक्ती ही देशभक्ती शिवाय होत नाही, पंढरीचे विठोबाला भजनाला आपला व्यवहार विठोबाला आवडेल असाच ठेवा, असे बोलता, बोलता एका सेवकांने घड्याळ वर करून दाखवले तेव्हा हे माझे शेवटचे भंजन आहे, असा स्पष्ट निर्वाळा दिला होता, त्याच वेळी या खंजरीने मला खूप साथ दिली, आता तिला विठ्ठल चरणावर लिन करतो. हरदम बना रहे दरबार! हे भंजन गाईले. खंजरीच्या अनेक आठवणी सांगताना गहिवरून आले. श्री गुरूदेव सेवक व वारकऱ्यांना सुध्दा अश्रू अनावर झाले. आजचा हा दिवस आषाढी एकादशीचा हा दिवस लाखों भक्त कधिही विसरू शकत नाही, त्यावेळी जेव्हा जेव्हा राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज पंढरपूर तिर्थक्षेत्री आलें की, सामाजिक कार्यकर्ते रामभाऊ सावंत यांच्याकडे भोजन ध्यायचे आणि जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांच्या मठात त्यांच्या राहण्याची स्वतंत्र व्यवस्था पंढरपूर वासीयांनी लावली होती, ती कायमची खोली महाराजांना देऊन टाकली होती. या सर्व पंढरीचा आदर्श वारकरी, समाजसुधारक, मानवतावादी महान संत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या पंढरपूर येथील आठवणी जागृत ठेवण्याचे खरे कार्य नागपूरचे ह.भ.प.रामराव महाराज ढोक यांनी जागृत ठेवले. तारीख ४ जुलै २०१७ची गोष्ट अ.भा.श्री गुरूदेव सेवा मंडळाचे जीवन प्रचारक सुधाकर वाढोणकर, महारोगी सेवा समिती शेंदुरजना बाजार यांनी संपूर्ण पंढरपूर शहर पालथे घातले आणि कामाला लागले, जवळच हनुमान मैदानाच्या शेजारी रामायणाचार्य ढोक महाराज यांचा मठ असल्याने सायंकाळी किर्तन हनुमान मैदानावर असायचे किर्तनाचा लाभ लाखों वारकरी घेत, अशा वेळी संकल्पना सुचली इ.स.२०१७ पासून दरवर्षी स्वत: रामराव महाराज ढोक यांच्या वतीने व्यासपीठ व साऊन्ड सिस्टिमची व्यवस्था विनामूल्य त्यांच्या वतीने करण्यात येत आहे, त्याच ठिकाणी अजूनही भव्य दिव्य सामुदायिक प्रार्थना व चिंतन ह.भ.प.प्रकाश महाराज वाघ, ह.भ.प.किर्तनकार लक्ष्मणदास काळे महाराज, बबनराव वानखेडे, दामोदर पाटील, वनवेदादा यांचे आलटून पालटून प्रबोधन झाले, एक वर्ष तर खुप पाऊस आला आणि अक्षरक्षा आषाढीचा दिवस चुकतोय का,असे वाटू लागले उभे राहून सामुदायिक प्रार्थना केली आणि ह.भ.प.ढोक महाराजांचे दर्शन घेऊन तसेच आम्ही सर्व मंडळी माघारी फिरलो,आज पर्यंत भंजन व सामुदायिक प्रार्थनेच्या कार्यक्रमाकरीता वरखेडचे संभाजी उके, उध्दवराव बेलूरकर, दिनकर चोरे, मोहनदास चोरे, अभिजित बेलूरकर, वरुडचे सुधाकर नागमोते गुरूजी, धनविजय सावरकर, गोपाल आजनकर, अशोकराव खापरे, नागपूरचे वसंतदास कुंभारे महाराज, चिमुरचे गजानन दौलतराव ठाकरे, बिड जिल्ह्यातील लखन गीते, पुण्याचे छायाचित्रकार प्रा.नवाडे साहेब पंढरपूर मध्ये राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या सेवा कार्याला वाहून घेणारे शिंदे , सेवक रामजी मिलमिले, डॉ.ऊगले साहेब, श्रीधर महाराज राऊत, यांच्या अथक परिश्रमाने गेल्या आठ वर्षांपासून उपस्थिती लाभते. गेल्या वर्षी पासून राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या भंजन गायक गोपाल अरूणभाऊ सालोडकर, शिवदास श्रृंगारे, प्रा.रविंद्र ठाकरे व त्यांचा भजन प्रशिक्षण शिक्षक यांच्या भजन व प्रबोधनामुळें अधिक आनंद मिळाला. हा दिवस आपल्या सर्वांचेच साठी ऐतिहासिकदृष्या महत्त्वाचा दिवस आहे. आजच्या दिवशी ग्रामगीता लेखन करण्याची प्रेरणा मिळाली. राष्ट्रसंताचे सांगाती सुदाम सावरकर प्रथम संपादक तर प्रथम ग्रामगीताचार्य श्री रामकृष्णदादा बेलूरकर यांच्यामुळे हा ग्रामगीता ग्रंथ जनमानसात गेला तर कर्मयोगी संत तुकाराम गीताचार्य यांनी विविध प्रादेशिक भाषेत अनुवाद करून प्रचार केला.यावर्षी सुध्दा आपण सर्वांनी वाढत्या गर्दीमुळे आपण आपणालां पोहचण्यासाठी माऊलींच्या ज्ञानेश्वर महाराज मंदिराकडे जाण्याऱ्या रस्त्याच्या समोरील पंढरपूर नगरपरिषद शाळा, सद्य:चे होमगार्ड प्रशिक्षण केंद्र, हनुमान मैदानावर आपल्या सर्वाचांच सर्वांसाठी असलेला कार्यक्रम म्हणजे आषाढी एकादशी दिनांक २५ जुलै २०२६रोजी हा दिवस लक्षात घेऊन पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांनी आर्वूजून उपस्थिती प्रार्थनीय आहे.



माणिकदास बेलूरकर
संत साहित्य अभ्यासक
श्रीक्षेत्र वरखेड ता.तिवसा
मो.९४२००७६५७३

# राशिभविष्य

**मेष :** अर्धवट राहिलेल्या कामाला नवी दिशा मिळेल. जुना ओळखीचा अनपेक्षित फायदा होईल. रागावर नियंत्रण ठेवा तर यश जवळ येईल.

**तुळ :** समतोल राखण्याची कला उपयोगी पडेल. भागीदारीत सकारात्मक घडामोडी होतील. आनंदाची बातमी मिळू शकते.

**वृषभ :** स्वत:वर केलेली गुंतवणूक भविषात फळ देईल. आर्थिक नियोजन विचारपूर्वक घ्या. कामात कौतुकाची थाप मिळण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक :** गुप्त योजना यशस्वी ठरेल. निर्णय घेताना मनापेक्षा विवेकाला साथ द्या. कामातील अडथळे हळूहळू दूर होतील.

**मिथुन :** नवीन कल्पनांना आज योग्य व्यक्तीची मिळेल. संवादातून अनेक गैरसमज दूर होतील. मित्रांकडून अनपेक्षित मदत मिळेल.

**धनु :** नवीन अनुभव तुमचा दृष्टिकोन बदलतील. शिक्षण आणि करिअरसाठी चांगल्या संधी मिळतील. प्रवासाचे नियोजन फायदेशीर ठरेल.

**कर्क :** भावनांवर नियंत्रण ठेवल्यास दिवस हलका जाईल. एखादा निर्णय तुमच्या बाजूने लागेल. लहान यशही मोठा आत्मविश्वास देईल.

**मकर :** जबाबदाऱ्या वाढतील. वरिष्ठांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळेल. कौटुंबिक विषय शांततेने हातीळा.

**सिंह :** नेतृत्व दाखवण्याची संधी येईल. कार्यक्षेत्रात तुमच्या मताला महत्व मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कुंभ :** चौकटबाहेरचा विचार फायदेशीर ठरेल. मित्रांकडून कामे वेगाने पूर्ण होतील. अनावश्यक वाद टाळा. नवीन संधींचे द्वार उघडेल.

**कन्या :** प्रत्येक गोष्टीत परिपूर्णता शोधू नका. आज छोट्या बदलातून मोठा लाभ होईल. कौटुंबिक वातावरण उत्साही राहील. प्रवासाचा योग.

**मीन :** अंतर्मनाचा आवाज योग्य मार्ग दाखवेल. आर्थिक नियोजनात शिस्त ठेवा. प्रियजनांसोबत आनंददायी दिवस असेल.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक : ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’

बाळ गंगाधर टिळक (केशव गंगाधर टिळक) २३ जुलै १८५६, १आगस्ट १९२० एक भारतीय स्वातंत्र्य सेनानी, शिक्षक, संपादक आणि लेखक होते. टिळक हे भारतीय स्वतंत्रचळवळीचेपहिले नेते होते. टिळक स्मारक ट्रस्टतर्फे देशासाठी व समाजात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवराला सन्मानित करण्यात येते. हा दिवस म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा सूर्योदय. याच दिवशी १८५६ साली एका तेजस्वी ताऱ्याचा जन्म झाला. ते नाव म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. त्यांना ‘लोकमान्य’ ही पदवी सामान्य जनतेनेच दिली कारण ते खऱ्या अर्थाने लोकांचे नेते होते.

टिळकांचा काळ हा पारतंत्र्याचा काळ होता. इंग्रज आपल्यावर राज्य करत होते. समाजात अंधश्रद्धा, जातीभेद आणि निराशा होती. अशा वेळी टिळकांनी हाती लेखणी आणि वाणीचा तलवार घेतली. ते म्हणाले, ‘आधी समाज



जागा झाला पाहिजे, मगच स्वराज्य मिळेल.’

**शिक्षण आणि संस्कृतीचे प्रबोधन**

टिळक हे केवळ राजकारणी नव्हते तर ते महान गणितज्ञ, संस्कृतचे अभ्यासक आणि खगोलशास्त्रज्ञ होते. ‘गीता रहस्य’ आणि ‘आर्कटिक होम इन द वेदाज‘ हे त्यांचे ग्रंथ आजही जगभरात वाचले जातात. त्यांनी सांगितले की आपला इतिहास आणि संस्कृती यांचा अभिमान बाळगा. परकीय सत्तेने आपल्याला मानसिक गुलाम केले आहे. ते तोडण्यासाठी स्वाभिमान जागवावा लागेल.

**सार्वजनिक गणेशोत्सव आणि शिवजयंती**

समाजाला एकत्र आणण्यासाठी टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. घराघरातला गणपती रस्त्यावर आला आणि सर्व जाती–जमाती एकत्र आल्या. १८९६ मध्ये त्यांनी शिवजयंती उत्सवाला राष्ट्रीय स्वरूप दिले. या दोन्ही उत्सवांमधून लोकांमध्ये देशभक्ती आणि एकतेची भावना निर्माण झाली. इंग्रजांना हे समजले आणि त्यांनी टिळकांना ‘भारतीय असंतोषाचे जनक’ म्हटले.

**‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे’**

१९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली तेव्हा टिळकांनी थेट स्वराज्याची मागणी केली. काँग्रेसमध्ये मवाळ आणि जहाल असे दोन गट पडले. टिळक जहाल गटाचे नेते बनले. त्यांची मागणी स्पष्ट होती – भीक नको, हक्क मागतो. ‘स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच’ हे वाक्य आजही प्रत्येक भारतीयाच्या रक्तात भिनले आहे.

इंग्रजांनी त्यांना ६ वर्षे मंडालेच्या तुरुंगात डांबले. पण तुरुंगातही त्यांनी ‘गीता रहस्य’ लिहिले. त्यांनी सांगितले की कर्म करा, फळाची अपेक्षा करू नका. हेच गीतेचे तत्व स्वातंत्र्य लढ्यातील तरुणांसाठी प्रेरणा बनले.


**पत्रकारिता आणि जनजागृती**

‘केसरी’ आणि ‘मराठा’ ही दोन वृत्तपत्रे म्हणजे टिळकांचे शस्त्र होते. त्यातून ते अन्यायाविरुद्ध लिहायचे. सत्य बोलल्यामुळे त्यांना अनेकदा तुरुंगवास भोगावा लागला. पण ते कधी झुकले नाहीत.

**आजच्या काळातील महत्व**

आज आपण स्वतंत्र आहोत. पण टिळकांचे विचार आजही तितकेच महत्वाचे आहेत. स्वाभिमान, कर्तव्यनिष्ठा, शिक्षण आणि एकता हे त्यांचे चार मंत्र आहेत. आज आपण सोशल मीडियावर आहोत, पण विचारांची स्पष्टता आणि निर्भयता टिळकांकडून शिकली पाहिजे.

टिळक १ ऑगस्ट १९२० रोजी गेले. पण जाताना त्यांनी आपल्याला एकच संदेश दिला – ‘जगा आणि जगू द्या, पण स्वाभिमानाने जगा.’ आज जयंतीच्या दिवशी आपण त्यांना फक्त हार घालून अभिवादन करू नये. तर त्यांचा एक विचार तरी कृतीत आणला पाहिजे. भ्रष्टाचाराविरुद्ध बोला, समाजासाठी काहीतरी करा, देशाचा अभिमान बाळगा. कारण खरे स्वराज्य तेव्हाच येईल जेव्हा प्रत्येक भारतीय टिळक बनेल. ‘स्वातंत्र्य मिळवणे सोपे आहे, पण ते टिकवणे कठीण आहे.’ – लोकमान्य टिळक जय हिंद, जय महाराष्ट्र



शेषराव नर्मदा गोपाळ कडू

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# वारकरी झाले भावभक्तीत चिंब! बाजीराव विहिरीजवळ नेत्रसुखद रिंगण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**सोलापूर** – आषाढी यात्रेसाठी पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील रिंगण गुरुवारी सायंकाळी सहा वाजता बाजीराव विहिरीजवळ रंगले.



वारकरी आनंदाने विठू नामाच्या जयघोषात नृत्य करण्यात दंग झाले. बाजीराव विहिरीजवळ महामार्गाच्या उड्डाणपुलावरून भाविकांनी रिंगण सोहळ्याचा अगदी डोळेभरून आनंद घेतला. या रिंगण सोहळ्यामुळे शेकडो किलोमीटर पायी आलेल्या वारकऱ्यांचा क्षीण कुठच्या कुठे निघून गेला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सावळ्या विठुरायाच्या दर्शनासाठी राज्यसह देशाच्या विविध भागातून संतांच्या पालख्या वाखरीत दखल झाल्या. दुपारी भंडीशेगाव येथून संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याने पंढरीच्या दिशेने प्रस्थान ठेवले. तत्पूर्वी संत सोपानकाका यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे विठुरायाच्या भेटीसाठी निघाला. त्यानंतर पिराची कुरोली येथून जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा पंढरपूरकडे निघाला.

संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा उभ्या रिंगणासाठी बाजीराव विहीरसमोर आला. उड्डाणपुलाच्या शेजारी सर्व्हिस रस्त्यालगत दुपारी लागलेले रिंगण पाहण्यासाठी वारकऱ्यांनी अलोट गर्दी केली होती. रिंगण पाहण्यासाठी वाखरीच्या पालखी तळावर दाखल झालेल्या विविध संतांच्या दिंडी सोहळ्यातील हजारो वारकरी बाजीराव विहीर परिसरात दाखल झाले.

सायंकाळी संत ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळा रिंगणस्थळी आला. यानंतर सेवेकऱ्यांनी टाळ – मृदंगाच्या तालावर खांद्यावर पालखी नाचवत रिंगण पाहण्यासाठी थांबलेल्या वारकऱ्यांच्या भोवतीने गोल रिंगण घातले. त्यानंतर मानाच्या दिंड्यांनी झेंडा घेऊन रिंगणात प्रदक्षिणा पूर्ण केल्यानंतर अश्वस्वाराने रिंगणाला सुरुवात केली. अश्वानी रिंगणातील फेऱ्या पूर्ण करून रिंगण पूर्ण केले. रिंगण पूर्ण होताच अश्वाच्या टापाची माती कपाळी लावण्यासाठी भाविकांची झुंबड उडाली होती.

विठुरायाच्या ओढीने पंढरपूरकडे निघालेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील गोल रिंगण बाजीराव विहिरीजवळ मोठया भक्तीमय वातावरणात पार पडले. लाखो विठ्ठल भक्तांनी यावेळी माउली माऊलींचा एकच जयघोष केला होता.

**पालखी सोहळे आज पंढरीत**

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातील सोलापूर जिल्ह्यातील दुसरे उभे रिंगण तर चौथे गोल रिंगण बाजीराव विहीर येथे पार पडले. यानंतर सायंकाळी पालखी सोहळा पंढरपूरच्या वेशीवर असलेल्या वाखरी पालखी तळ येथे विसावला. शुक्रवारी वाखरी येथून दुपारी सोहळा पंढरपूरकडे प्रस्थान ठेवणार आहे. पालखी सोहळे पंढरपूरच्या वेशीवर आल्याने भाविक पांडुरंगाचा जयघोष करत आहेत.

# जंतर-मंतरवर पाठवला ६८ हजार रुपयांचा 'चीझ बर्स्ट' पिझ्झा

## नागालँडच्या तरुणाचं आंदोलनाचा अनोखं समर्थन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी आणि 'नीट' पेपर फुटीविरोधात दिल्लीतील जंतर-मंतरवर शेकडो तरुण-विद्यार्थी गेल्या महिन्याभरापासून आंदोलन करत आहेत.



या आंदोलक विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन देश-विदेशातून लोक औषधे आणि खाण्यापिण्याच्या वस्तू पाठवून त्यांना पाठिंबा दर्शवत आहेत. दरम्यान, नागालँडमधील एका तरुणाच्या कृतीने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले असून सर्वांचे मन जिंकले आहे. आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे समर्थन करण्यासाठी या तरुणाने नागालँडमध्ये बसूनच जंतर-मंतरवर उपोषणाला/आंदोलनाला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुमारे ६८,००० रुपयांचे तब्बल १५० पिझ्झा ऑर्डर केले! सोशल मीडियावर तरुणाच्या दातृत्वाचे कौतुक सोशल मीडियावर या तरुणाच्या या कृतीचे जोरदार कौतुक होत असून लोक त्याच्या संवेदनशीलतेचा आणि मानवतेचा आदर करत आहेत. तरुणाने आपल्या इंस्टाग्राम पेजवर याबद्दल माहिती देताना सांगितले की, दिल्लीत आंदोलन करणाऱ्या आपल्या लहान भावा-बहिणींसाठी त्याने हे पिझ्झा पाठवले आहेत. त्याने 'डोमिनोज'मधील पिझ्झा ऑर्डरचा स्क्रीनशॉट देखील सोशल मीडियावर शेअर केला आहे. तरुणाने आपल्या पोस्टमध्ये लिहिले, 'मी इथे नागालँडमध्ये बसलो आहे आणि तिथे हजारो विद्यार्थी आपल्या घरापासून दूर जंतर-मंतरवर चांगल्या भविष्यासाठी आणि चांगल्या शिक्षण व्यवस्थेसाठी लढा देत आहेत. माझे भाऊ-बहीण तिथे उपाशी पोटी आंदोलन करत आहेत या दुःखात आज रात्री मी स्वतःचे जेवणही करू शकलो नाही.

# विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा उतसाहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – जिल्हा व सत्र न्यायालय येथे बुधवार, दि.२२ जुलै रोजी विधी स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यशाळा पार पडली. सदर कार्यशाळेला ७३ नवनियुक्त विधी स्वयंसेवक प्रशिक्षणासाठी प्रत्यक्षरित्या, तसेच तालुकास्तरावर नवनियुक्त २०७ विधीस्वयंसेवक आभासी पद्धतीने उपस्थित होते.



प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या उज्वला नंदेश्वर, जिल्हा व सत्र न्यायालय जिल्हा न्यायाधीश ए. जी. जोशी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, तसेच जिल्हा सहकारी वकील परिक्षीत गणोरकर यांचे हस्ते उद्घाटन झाले.

यावेळी उज्वला नंदेश्वर यांनी विधी स्वयंसेवक यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यप्रणाली बाबत माहिती देऊन स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये विधी स्वयंसेवक यांना विविध विषयावर प्रमुख वक्ते यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेमध्ये विधी स्वयंसेवक यांना ॲड.सपना काळे, विधळे, पॅनल अधिवक्ता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अमरावती सखी वन स्टॉप सेंटरच्या समुपदेशिका वर्षा देशमुख, सायबर सेलचे निखील माहुरे, प्रा.रचना पिंपळगावकर, महिला व बाल कल्याण समितीच्या सदस्या सुचिता बर्वे, वाहतुक शाखेच्या पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राम्हणे, समुपदेशिका वनिता राऊत, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालयामधील उपमुख्य अधिवक्ता ॲड.अमित सहारकर, पंजाबराव विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख यांनी मार्गदर्शन केले.

समारोपीय कार्यक्रमात विधी स्वयंसेवक यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांनी मार्गदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# आज आंदोलकांना घाबरवलं, उद्या सामान्य माणसालाही अडकवतील, धमकी देणाऱ्या पोलिसांचा मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब बंदोबस्त करावा : जयंत पाटील

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पोलीस धमकी देतात याचा अर्थ त्यांना ड्रग्स सहज उपलब्ध होतं का? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा पोलिसांचा ताबडतोब बंदोबस्त केला पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी व्यक्त केले. आज हे आंदोल नकर्त्या विद्यार्थ्यांना घाबरवत आहेत, उद्या सामान्य माणसाला अडकवण्या साठीही असंच करतील, अशी भीतीजयंत पाटील यांनी व्यक्त केली.



बुधवारी मुंबई येथे झालेल्या आंदोलनादरम्यानचा पोलिस कर्मचाऱ्याचा विद्यार्थ्यांना धमकावणारा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला आहे. या व्हायरल झालेल्या व्हिडिओव रजयंत पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सामान्य माणसाला अडकवण्यासाठीही असंच काही करतील जयंत पाटील म्हणाले की, मुंबईतील एक पोलीस कर्मचाऱ्याने लहान आंदोलकांना धमकावणारा व्हिडिओ प्रसारित झाला आहे. या पोलिस कर्मचाऱ्यांकडे ड्रग्स येतात कुठून? पोलिस धमकी देतात याचा अर्थ त्यांना ड्रग्स सहज उपलब्ध होते.

अशा पोलिसांचा ताबडतोब बंदोबस्त केला पाहिजे अशी मागणी त्यांनी केली. तसेच मागील पावसाळी अधिवेशनात आपण वाढत्या ड्रग्सबाबत सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता.

काही पोलीस या ड्रग्स माफीयांकडून हफ्ते घेतात व हा काही पोलिसांचा सोर्स ऑफ इन्कम झाला आहे असंही मी म्हटलं होतं असं त्यांनी नमूद केले. आज हे आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांना घाबरवत आहेत, उद्या सामान्य माणसाला अडकवण्यासाठीही असंच काही करतील अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली आहे की अशा घटनांमुळे लोकांचा पो-लीस यंत्रणेवर गैरविश्वास निर्माण होतोय. त्यामुळं वेळीच अशा कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे असे जयंत पाटील म्हणाले.

## ग्रामीण रुग्णालय येथे

# शिबिरातील रुग्णांकडून अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – ग्रामीण रुग्णालय येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अंतर्गत आयोजित विशेष शस्त्रक्रिया शिबिरामध्ये २१ रुग्णांवर यशस्वी सामान्य शस्त्रक्रिया करण्यात आल्या.



यामध्ये अंडवृद्धी, पोटाचा हर्निया, अपेंडिक्स तसेच इतर सामान्य शस्त्रक्रियांचा समावेश होता.

या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रमोद पोतदार, डॉ.परीक्षित रामपुरे, शल्यचिकित्सक डॉ.प्रविण बिजवे, डॉ.राहुल खन्ना, डॉ.गोपाल कापसे (भूलतज्ज्ञ), डॉ.पंकज बिजवे, डॉ.हर्षाली पावडे, डॉ.जगदीश काळभोर व डॉ.अश्विनी वंजारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच डॉ.हेमंत वैष्णव, डॉ.जीविका आंडे, वरुड व मोर्शीचे वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर, राखी कदम, प्रांजली खेरडे, संदीप पवार, सागर झटाले, अक्षय सोनवणे, सुनील नांदगावकर, कुणाल इमले, ललिता गवई, शालू खंडारे तसेच महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे राजेंद्र सावळकर, गणेश हेटे, विशाल चौधरी आणि ग्रामीण रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. या कार्याची पोचपावती म्हणुन आज शिबिरातील सर्व रुग्णांनी ग्रामीण रुग्णालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी रुग्णांनी रुग्णालय प्रशासनाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करुन सर्वांचे आभार मानले.

याप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार यांनी सर्व रुग्णांचे आभार मानले तसेच भविष्यातही ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार, मोफत व सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण रुग्णालय वरुड सदैव कटिबद्ध राहील अशी ग्वाही दिली.

# 'पोक्सो' कायद्याअंतर्गत आरोपीला जामीन मंजूर

## आरोपीच्या वतीने ॲड.दिनेश सदापुरे यांनी मांडली बाजू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने 'पोक्सो' कायद्याअंतर्गत आरोपीचा जमीन मंजूर केला. आरोपीच्या वतीने प्रसिध्द विधिज्ञ ॲड.दिनेश पी.सदापुरे यांनी बाजु मांडली.




आरोपी रोशन रामकिसन धुर्वे याचे विरुद्ध बेनोडा (शहीद) पोलीस स्टेशन यांनी भारतीय न्याय संहिता कलम ७८ (१), (२), ३५१ (२), ३५२, पोक्सो कलम १२ कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करुन त्याची न्यायालयीन कोठडी मंजूर केलेली होती. त्यानंतर आरोपीच्या वतीने ॲड.दिनेश पी.सदापुरे यांनी फौजदारी जमीन अर्ज न्यायालयात दाखल केला. त्यावेळी न्यायालयाने आरोपीला जामीन का देण्यात येऊ नये म्हणुन पोलीस स्टेशन अधिकारी व फिर्यादीला यांना नोटीस जारी केले. फिर्यादीने आरोपी विरुद्ध असा आरोप केलेला होता की, तिच्या मुलीचे वय १४ वर्ष असे आहे व तिचे सोबत आरोपीने तिचा पाठलाग करुन विनयभंग केला व तिचे वडिलाला जिवाने मारण्याची धमकी दिली. त्यामुळे तिच्या आईने पोलीस स्टेशन बेनोडा (शहीद)येथे तक्रार नोंदविली. यावेळी सरकारी पक्षाने आरोपीच्या जामिनाला तीव्र विरोध केला आरोपीकडून अशाच प्रकारची प्रवृत्ती भविष्यात होऊ शकते, आरोपी व फिर्यादी एकाच गावचे असल्यामुळे पुन्हा सदर गुन्हा घडण्याची दाट शक्यता आहे तसेच आरोपी फिर्यादीवर दबाव आणु शकतो, त्यावेळी आरोपीचे वकील ॲड.दिनेश सदापुरे यांनी असा युक्तिवाद केला की, पोलिसांचा तपास हा जवळपास संपलेला आहे, त्याचप्रमाणे पिडीता व आरोपीमध्ये मैत्रिपुर्ण संबंध होते व ही बाब पीडीतेच्या परिवाराला माहीती झाली म्हणुन आरोपी विरुध्द तक्रार नोंदविण्यात आली. तरीही आरोपी हा निर्दोष आहे, कारण कोणत्याही न्यायालयात त्याचे विरुध्द कुठल्याही गुन्हयाची नोंद नाही म्हणुन तो प्रथमदर्शनी निर्दोष मानला जाईल. न्यायालयाने दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकून सर्व मुद्दे पुराव्या अंतिम ठरवल्या जाईल पण प्रथम दर्शनी आरोपीला जामीन देण्यास कुठल्याही प्रकारची हरकत नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले. आरोपीचा जामीन मंजूर केला त्यावेळी शर्ती व अटी आरोपीवर लादण्यात आल्यात. आरोपीने शर्ती व अटीचे उल्लंघन केल्यास आरोपीची जमानत रद्द होण्यास पात्र राहील, असे न्यायालयाने निर्देश दिले.

सदर खटला व न्यायालयीन कामकाजात ॲड.दिनेश सदापुरे यांना ॲड.मनिष विटाळकर, ॲड.डी.टी.निकम, ॲड.वर्षा मिरगे, ॲड.प्रतिक्षा राऊत, ॲड.राहुल बोरकर व ॲड.पवन कोल्हारे, ॲड.ज्ञानदिप पाटणकर यांनी देखील सहकार्य केले.

# पालिका सभागृहातही पडसाद! 'मोदी हाय हाय, विद्यार्थ्यांना न्याय द्या': महापालिकेत विरोधकांची जोरदार घोषणाबाजी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – नीट पेपरफुटीनंतर सध्या देशभरात आंदोलन सुरू असतानाच, विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाचे पडसाद गुरुवारी मुंबई महापालिकेच्या सभागृहातही उमटले. सभागृहाचे कामकाज सुरू होताच विरोधकांनी 'मोदी हाय हाय,' 'विद्यार्थ्यांना न्याय द्या,' अशी जोरदार घोषणाबाजी केली. विरोधकांच्या घोषणाबाजीतही महापौर रितू तावडे यांच्या अध्यक्षतेखाली सभागृहातील कामकाज पार पडले. पेपरफुटीवरून देशातील वातावरण चांगलेच तापले असताना गुरुवारी काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या पक्षाच्या नगरसेवकांनी महापालिका सभागृह सुरू होताच, बॅनरबाजी करत नरेंद्र मोदींविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. 'पेपरफुटी बंद करा,' 'विद्यार्थ्यांना न्याय द्या...', 'चोर है, चोर है, मोदी सरकार चोर है...' 'खुनी है खुनी है, मोदी सरकार खुनी है...' 'वंदे मातरम', 'जय भवानी जय शिवाजी,' अशा



घोषणा देत विरोधकांनी संपूर्ण सभागृह दणाणून सोडले. परंतु याला सभागृहामध्ये भाजप व शिवसेना नगरसेवकांकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आले नाही. एरवी मोदींविरोधात घोषणा दिल्यानंतर प्रतिउत्तर देणारे भाजप नगरसेवकही गप्प होते. विरोधकांनी घातलेल्या गोंधळाच्या वातावरणात महापौर रितू तावडे यांनी सभागृहाचे कामकाज चालवले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महसूल समाधान व भव्य रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मोर्शी** – मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त सिंभोरा रोड, दुर्गवाडा (ता.मोर्शी) येथील रिसॉर्ट कस्तुरी पर्ल येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' व भव्य रक्तदान शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात आणि मोठ्या प्रतिसादात यशस्वीरीत्या पार पडले.





शिबिरामध्ये महसूल विभागासह विविध शासकीय योजनांबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. नागरिकांच्या विविध समस्या ऐकून त्यांचे तातडीने निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी आवश्यक सूचना दिल्या. शासनाच्या लोकाभिमुख योजनांची माहिती मोठ्या प्रमाणावर नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली.

यावेळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरात भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी जपत अनेक युवकांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा प्रेरणादायी संदेश दिला.

या कार्यक्रमाला मोर्शी-वरुडचे उपविभागीय अधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, मोर्शीचे तहसीलदार सागर ढवळे, वरुडचे तहसीलदार रामदास शेळके, विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी, भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रा.सुमित पवार, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, वरुडचे नगराध्यक्ष ईश्वर सलामे, मोर्शीच्या नगराध्यक्षा प्रतिभा गुल्हाने, शेघाटच्या नगराध्यक्षा सुवर्णा वरखडे, नगरसेवक तसेच मोर्शी व वरुड तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्व शासकीय अधिकारी-कर्मचारी, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, रक्तदाते आणि उपस्थित नागरिकांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी मोर्शी यांचे न्यायालय

रा.मा.क्र.एम.आर.सी.८१/पुसला/ /२०२२-२३

जाहीरनामा

याव्दारे सर्वत्र जाहिर करण्यात येते की, आवेदक प्रादेशिक प्रबंधक (किरकोळ विक्री), भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड, विभागीय कार्यालय, अकोला यांनी मौजा पुसला, ता.वरुड, जि.अमरावती येथील शेत भूमापन क्र.१३२, मध्ये किरकोळ विक्रीकरीता पेट्रोलपंप सुरु करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर केल्यावरून सदर ठिकाणी किरकोळ विक्रीकरीता पेट्रोलपंप सुरु करण्यासाठी नाहरकत देण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयाचा अभिप्राय मागितलेला आहे.

पेट्रोलपंप सुरु करावयाच्या शेतजमिनीचा तपशिल

| अ.क्र. | तालुका | गाव | शेत भुमापन क्र. | शेत मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| १ | वरुड | पुसला | १३२ | श्री.अनिल गुलाबराव डोंगरे<br>रा.पुसला ता.वरुड, जि.अमरावती |

सबब याबाबत ज्या कोणालाही आक्षेप वा हरकत दाखल करावयाची असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्दीचे दिवसापासून १५ दिवसाचे आत आपली हरकत वा आक्षेप समक्ष हजर राहून लेखी स्वरुपात या कार्यालयात सादर करावी. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

दि.८/१२/२०२२

उपविभागीय अधिकारी
मोर्शी

# ज्योतिषशास्त्र, अंकशास्त्राचे शिक्षणच घेतले नाही : ईडीसमोर भोंदूबाबा खरातची कबुली

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – मी ज्योतिषशास्त्र किंवा अंकशास्त्रात औपचारिक शिक्षण किंवा मान्यताप्राप्त पदवी मिळवलेली नाही, अशी कबुलीच भोंदूबाबात अशोक खरातने ईडीच्या चौकशीत दिली. ४२.८८ कोटींच्या मनी लॉँड्रिंग प्रकरणात आरोपी असलेला भोंदू बाबा तथा स्वयंघोषित महाराज अशोक खरात याने 'ईडी'ला सांगितले की, दोन दशकांपासून तो अध्यात्मिक सल्लागार म्हणून आपली प्रतिमा निर्माण करत होता आणि त्याच्या भाकितांवर अनब अनुष्ठानांवर विश्वास ठेवून उद्योगपती, राजकारणी आणि इतर प्रभावशाली व्यक्ती त्याच्याकडे आकर्षित होत होते.

खरातच्या या जबाबाचा उल्लेख 'ईडी'ने मुंबईतील विशेष पीएमएलए न्यायालयात दाखल केलेल्या तक्रार अर्जात केला आहे. खरातचा मर्चंट नेव्हीतील निवृत्त कर्मचाऱ्यापासून नाशिकमधील अत्यंत प्रभावशाली स्वयंघोषित बाबा बनण्यापर्यंतचा प्रवास या जबाबात नमूद आहे.

अध्यात्मिक शक्ती, यश आणि राजकीय प्रगती मिळेल या आशेने अनेक उद्योगपती, राजकारणी आणि इतर प्रमुख व्यक्ती त्याचा आशीर्वाद घेण्यासाठी आणि 'अवतार पूजा' करण्यासाठी येत असत. खरातने या प्रभावाचा वापर करून बेनामी बँक खाती, पतसंस्था आणि स्थावर मालमत्तेत गुंतवणूक करून मनी लॉँड्रिंगचे नेटवर्क उभे केले.

# पत्नीचे उत्पन्न पतीपेक्षा अधिक असल्यास पोटगीचा हक्क नाही

**मुंबई उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय, उच्चशिक्षित महिलेची याचिका फेटाळली**



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – पत्नीचे उत्पन्न पतीपेक्षा अधिक असल्यास पोटगीचा हक्क मिळणार नाही, असा महत्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. परदेशातील महागडे राहणीमान हे पोटगीचे कारण ठरू शकत नाही, असे स्पष्ट निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. अमेरिकेत राहणाऱ्या महिलेची दरमहा १ लाख अंतरिम पोटगीची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे. संबंधित महिला उच्चशिक्षित, नोकरीत असून तिचे उत्पन्न पतीपेक्षा जास्त आहे. पोटगीचा उद्देश उदरनिर्वाहासाठी आर्थिक आधार देणे आहे, अतिरिक्त खर्च भागवणे नव्हे, असा निवाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमुर्ती भारती डांगरे व न्यायमुर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने हा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. केवळ परदेशातील राहणीमान खर्चिक असल्याच्या कारणावरून कोणतीही पत्नी आपल्या पतीकडून अंतरिम पोटगी मिळवण्यास पात्र ठरू शकत नाही. परदेशात राहत असल्याचे सांगून विभक्त पतीकडून पोटगी मागता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने एका प्रकरणात दिला. हा निवाळा देत न्यायालयाने उच्चशिक्षित आणि नोकरदार महिलेची दरमहा १ लाख रुपयांची पोटगी देण्याची याचिका फेटाळून लावली आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५९२/२०२६** **ने.ता.२१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) प्रकाश शंकर गणगणे, वय अं.४६ वर्ष, धंदा-मजुरी

२) गजानन शंकरराव गणगणे, वय अं.४४ वर्ष, धंदा-मजुरी

दोघेही रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शंकर सदाशिव गणगणे व मयत सुशिलाबाई शंकरराव गणगणे, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१६/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.म.दा.सैंदाणे, दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६१०/२०२६** **ने.ता.२७/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) प्रभाबाई शिवहरी आंडे, वय अं.७५ वर्ष, धंदा-घरकाम, २) संजय शिवहरी आंडे, वय अं.५४ वर्ष, धंदा-मजुरी, ३) विजय शिवहरी आंडे, वय अं.४९ वर्ष, धंदा- मजुरी, अर्जदार क्र.१ ते ३ रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती, ४) उर्मिला सुभोध श्रीखंडे, वय अं.५६ वर्ष, धंदा- घरकाम, रा.कळमेश्वर,जि.नागपूर, ता.कळमेश्वर, ५) अर्चना दत्तराज श्रीखंडे, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम, रा.हनुमान नगर, नागपूर, ता.जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शिवहरी मारोती आंडे, रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, २ रे सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५७६/२०२६** **ने.ता.२१/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) मंदा सुरेशरावजी कुवारे, वय अं.४९ वर्ष, धंदा-घरकाम, २) विवेक सुरेश कुवारे, वय अं.२० वर्ष, धंदा-शेती, ३) तृशाली सुरेश कुवारे, वय अं.२३ वर्ष, धंदा-घरकाम, ४) नंदिनी सुरेशराव कुवारे, वय अं.१८ वर्ष, धंदा- शिक्षण, अर्जदार क्र.१ ते ४ रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :-** **गैरअर्जदार**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मय्यत सुरेश तुकाराम कुवारे, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.२१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# भारताच्या विद्यार्थ्यांसोबत उभं राहताना आम्हाला कोणी रोखू शकत नाही

## राहुल गांधी इंडिया आघाडीच्या खासदारांसह गांधी स्मृती स्थळावर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – कॉकरोच जनता पार्टीच्या नेतृत्वात दिल्लीतील जंतरमंतरवर विद्यार्थ्यांचं नीट पेपरफुटीच्या मुद्यावर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आंदोलन सुरु आहे. देशभरातील आंदोलक विद्यार्थ्यांसोबत असल्याचं सांगण्यासाठी राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह इंडिया आघाडीतील सर्व राजकीय पक्षांचे खासदार नवी दिल्लीतील गांधी स्मृतीस्थळावर पोहोचले. या स्थळावर पोहोचण्यापूर्वी राहुल गांधी यांनी एक व्हिडिओ शेअर केला आहे. भारताच्या विद्यार्थ्यांसोबत उभं राहताना आम्हाला कोणी रोखू शकत नाही, असं राहुल गांधी यांनी म्हटलं. राहुल गांधी यांनी माध्यमांसोबत बोलताना म्हणाले की आम्हाला इंडिया गेटवर जायचं होतं. विद्यार्थ्यांसोबत आहोत, असा मेसेज द्यायचा होता. मात्र, सरकारकडून त्याला परवानगी न मिळाल्यानं आम्ही गांधी स्मृती स्थळी जात आहोत.



## पालिका मुख्यालयातील उपाहारगृह सील

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** –ताकात माशी, कांदा भजीत प्लास्टिकचा धागा अशा तक्रारींमुळे सध्या गाजत असलेले मुंबई महापालिका मुख्यालयातील उपाहारगृह सील करण्यात आले आहे. अन्न व औषध प्रशासन विभागाने ही कारवाई केली असून १५ दिवसांसाठी कमल उपाहारगृहाचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच असा प्रकार घडला आहे. दरम्यान, महापालिकेतील कामगार अधिकारी याबाबत अनभिज्ञ असल्याचे समोर आल्याने त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी गुरुवारी झालेल्या बैठकीत दिले.

# स्मार्ट मीटरची सक्ती केल्यास गाठ माझ्याशी राहील

## माजी आमदार देवेंद्र भुयार यांचा महावितरणला गंभिर ईशारा

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरुड** –मोर्शी विधानसभा मतदार संघातील वरूड मोर्शी तालुक्यामध्ये महावितरणकडून राबविण्यात येत असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेबाबत अनेक वीज ग्राहकांकडून वाढीव वीज बिले, पूर्वसंमतीशिवाय मीटर बदलणे आणि तक्रारींना अपेक्षित प्रतिसाद न मिळणे अशा स्वरूपाच्या तक्रारी समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार देवेंद्र भुयार यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

ग्राहकांच्या हिताला प्राधान्य देत त्यांनी शासन आणि महावितरणने या तक्रारींची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी केली. देवेंद्र भुयार म्हणाले की, वरूड मोर्शी तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी, लघुउद्योजक आणि मध्यमवर्गीय आधीच महागाईच्या संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत वीज ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात वाढीव बिलांच्या तक्रारी येत असतील, तर त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

ग्राहकांचा विश्वास संपादन करण्याऐवजी त्यांच्यावर वाढीव बिलांचा आर्थिक भार पडत असल्याची भावना निर्माण होणे ही चिंतेची बाब आहे.

मी शासन आणि महावितरणसमोर मागण्या मांडल्या आहेत त्यामध्ये स्मार्ट मीटरबाबत प्राप्त झालेल्या सर्व तक्रारींची स्वतंत्र तांत्रिक समितीकडून चौकशी करण्यात यावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत वाढीव वादग्रस्त बिलांची सक्तीची वसुली थांबवावी, ग्राहकांची लेखी संमती घेतल्याशिवाय मीटर बदलू नयेत, प्रत्येक ग्राहकाला मीटर रीडिंग, वीज वापर आणि बिलाची संपूर्ण माहिती पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून द्यावी, चुकीचे बिल आढळल्यास तातडीने दुरुस्ती करून ग्राहकांना न्याय द्यावा, वीज ग्राहकांसाठी तालुकास्तरावर विशेष तक्रार निवारण शिबिरे आयोजित करावीत यासह आदी मागण्या मान्य करून ग्राहकांना दिलासा देण्याची मागणी केली आहे.

'जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून महावितरणने मनमानी सुरूच ठेवली, तर वीज ग्राहकांसोबत रस्त्यावर उतरेल. महावितरण कार्यालयांसमोर तीव्र आंदोलन, धरणे आणि लोकशाही मार्गाने जनआंदोलन उभारले जाईल. सर्वसामान्य ग्राहकांवर अन्याय होऊ देणार नाही, असा ईशाराही देवेंद्र भुयार दिला आहे.

# संभाजीनगरमधील प्रसिद्ध हॉटेल एफडीए कडून सील : जिलेबीच्या गोडव्यात भेसळ, तुकाराम मुंढेंच्या विभागास काय आढळल्या त्रुटी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**छ.संभाजीनगर** – राज्यात गेल्या दोन महिन्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने धडाकेबाज कारवाईला सुरुवात केली आहे. सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यापासून अवैध गुटखा आणि हॉटेल्स व्यवसायिकांवर धडाकेबाज कारवाई करण्यात आली आहे. तसेच, दूध भेसळ आणि भेसळयुक्त पदार्थांवरूनही कारवाईचा बडगा अद्याप सुरूच आहे. त्यातच, एफडीएने आता छत्रपती संभाजी नगर शहराला इमरतीची ओळख देणारं हॉटेल एफडीएकडून सील करण्यात आलंय. येथील गंभीर त्रुटींमुळे एफडीएने थेट परवाना निलंबित करत आस्थापनाच बंद केलं. छत्रपती संभाजीनगरातील प्रसिद्ध मे. उत्तम उपहार गृहवर अन्न व औषध प्रशासन विभागाने धाड टाकली आहे. येथील एफडीएच्या धडक कारवाईत उघड झालेलं वास्तव धक्कादायक आहे. कारण, ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या गोड पदार्थांच्या मागे आरोग्याशी खेळ सुरू असल्याचं या तपासणीत समोर आलं. मिठाई तयार करण्यासाठी वारंवार वापरलेलं तेल... पुन्हा पुन्हा वापरलेलं वनस्पती तूप... झुरळांचा वावर... अस्वच्छ परिसर... ड्रेनेजजवळ उघड्यावर ठेवलेलं इडलीचं पीठ... तंबाखूची पाकिटं... भिंतींवर थुंकल्याच्या खुणा... कामगारांचे मेडिकल फिटनेस प्रमाणपत्रही नाही... इतकंच नाही तर मिठाईमध्ये वापरल्या जाणाऱ्या कृत्रिम रंगाबाबत कामगारांनाही माहिती नसल्याचं एफडीएच्या तपासणीत आढळून आलं आहे.

# विरोधक, सत्ताधाऱ्यांची निदर्शने : संसदेबाहेर जोरदार घोषणायुद्ध

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**नवी दिल्ली** – नीट पेपरफुटी प्रकरणावरून संसद परिसरातील 'मकर द्वार' येथे विरोधी पक्ष आणि सत्ताधारी एनडीएचे खासदार गुरुवारी आमनेसामने आले.

यावेळी त्यांच्यात जोरदार घोषणायुद्ध झाले. विरोधी 'इंडिया' आघाडीच्या खासदारांनी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत 'इस्तीफा दो' (राजीनामा द्या), 'गद्दी छोडो' (सत्ता सोडा) आणि 'शर्म करो' अशा जोरदार घोषणा दिल्या.



काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी, प्रियंका गांधी–वढेरा यांच्यासह काँग्रेस व विरोधी पक्षाच्या अनेक खासदारांनी हातात मोठा बॅनर धरून शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली.

त्यानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह इतर प्रमुख नेतेही या निदर्शनांमध्ये सहभागी झाले दुसऱ्या बाजूला, सत्ताधारी एनडीएच्या खासदारांनी विरोधी पक्ष या मुद्द्याचे राजकारण करत असल्याचा आरोप केला.







